Indian Academy of Pediatrics (IAP)
महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)

## पालकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे :

प्रकरण ९१ :

# त्वचेची ॲलर्जी असलेल्या मुलाची काळजी

अध्यक्ष २०२३ : डॉ. रमाकांत पाटील
सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार
अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया
मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये
समन्वयक : डॉ. नरेंद्र नानिवडेकर
अनुवादक : डॉ. रेणू बोराळकर
पुनरावलोकन : डॉ. चित्रा दाभोळकर
सौ. लीना पागे

*Convener:* K Nagaraju
*Members:* A Arumugam, Mangai Sinha, Vivek Saxena
*Reviewer:* Narayan P Modi



लहान बाळाच्या त्वचेच्या आजारामध्ये ॲलर्जीचा सहभाग फार मोठा आहे आणि अशा बाळांना पुढे दम्याचा त्रास होण्याची देखील शक्यता असते या आणि इतर अनेक त्वचेच्या ॲलर्जीबद्दल तज्ज्ञ काय म्हणतात ते पाहू या.

### "त्वचेची ॲलर्जी असलेल्या मुलाच्या काळजीसंबंधी वारंवार विचारले जाणारे १० प्रश्न."

प्र.१ त्वचेची ॲलर्जी म्हणजे काय?

प्र.२ आमच्या कुटुंबातील इतर कोणालाही ॲलर्जी नाही तरीही माझ्या सर्वात लहान मुलाला त्वचेच्या ॲलर्जीचा त्रास का होतो?

प्र.३ माझ्या बाळाला त्वचेचा इसब आहे. माझे मुल मोठे झाल्यावर त्याला दम्याचा त्रास होईल का?

प्र.४ माझे मुल सतत खाजवत राहते, त्याची अस्वस्थता कमी करण्यासाठी मी काय करु?

प्र.५ माझ्या मुलाच्या पुरळासाठी म्हणून लिहून दिले होते ते मलम मी (माझ्या मनाने) लावू का? कारण त्याने लगेच पुरळ कमी होते.

प्र.६ काही अन्नपदार्थ माझ्या मुलाला त्वचेची ॲलर्जी होऊ शकते का?

प्र.७ मला दोन मुले आहेत. एकाला अंगावर पुरळ उठते (hives) आणि दुसऱ्याला बालइसब (atopic eczema) आहे. त्यांच्या ॲलर्जीसाठी चाचण्या करुन घेण्याची गरज आहे का?

प्र.८ माझ्या मुलाला कधी कधी खूप खाज सुटून त्वचेवर लाल पुरळ येते. काही वेळाने बरे होते किंवा नाहीसे होते. ते कुठल्या प्रकारचे पुरळ असेल?

प्र.९ माझी मुलगी जेव्हा कृत्रिम कानातले किंवा बांगड्या घालते तेव्हा तिच्या त्वचेवर लाल पुरळ उठते, खाज सुटते आणि त्वचेतून पाण्यासारखा स्राव होतो. तिला धातूंची ॲलर्जी आहे का?

प्र.१० मुलाची त्वचेची ॲलर्जी पूर्णपणे बरी होऊ शकते का?

Under the Auspices of the IAP Action Plan 20202021

**Piyush Gupta** IAP President 2021
**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021
**Bakul Parekh** IAP President 2020
**GV Basavaraja** IAP HSG 20202021
**Deepak Ugra** National Co-ordinator

Scanned with OKEN Scanner

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* **Deepak Ugra**
*Member Secretaries:* **Upendra Kinjawadekar, Samir Dalwai**
*Members:* **Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman**

Scanned with OKEN Scanner

# त्वचेची ॲलर्जी असलेल्या मुलाची काळजी

प्र. १

## त्वचेची ॲलर्जी म्हणजे काय?

त्वचेची असात्मीयता म्हणजेच ॲलर्जी. काही अतिसंवेदनाकारी (allergens) किंवा विक्षोभकांच्या (irritants) संपर्कात आल्याने त्वचेला कोरडेपणा येतो आणि खाज सुटणारे लाल पुरळ येते. हे अनुवंशिक असते. परंतु अनुवंशिकता नसलेल्या व्यक्तीमध्ये देखील होऊ शकते.

ॲलर्जीमुळे immunglobulin E (IgE) आणि histamine ही रसायने निर्माण करणारी प्रतिपिंडे जास्त प्रमाणात तयार होतात आणि मग इतर प्रतिक्रियांची मालिका सुरु होते.

त्वचेची ॲलर्जी असलेल्या मुलांची काळजी

**त्वचेची ॲलर्जी**

**इसब** (Atopic dermatitis or eczema)

**पुरळ / त्वचेवरील पित्त** (urticaria)
**यामुळे होऊ शकतो**
-जंतुसंसर्ग
-अन्न
-औषधे
-कीटकातील विष
-सूर्यप्रकाश उष्णता किंवा थंडीला उद्भअसन
-स्वत:च्याच प्रतिकारशक्ती विरुद्ध आजार
-माहित नसलेली कारणे

**बाल इसब**
त्वता कोरडी होणे, खाज येणे, मोठ्या मुलांमध्ये हाता पायाच्या सांध्यामध्ये, चेहरा आणि मानेवर दिसून येते

**संपर्कामुळे होणारे त्वचारोग**
काही विशिष्ट वस्तूंच्या संपर्कात आल्यामुळे त्वचेवर पुरळ उठतात.
एकतर
ॲलर्जीमुळे उठणारा संपर्क त्वचारोग,
लेटेक्स, निकेल किंवा सौंदर्यप्रसाधने
किंवा
प्रक्षोभक गोष्टींमुळे होणारा संपर्क त्वचारोग
साबण लाळ इत्यादी

Scanned with OKEN Scanner

## प्र. २

### आमच्या कुटुंबातील इतर कोणालाही ॲलर्जी नाही तरीही माझ्या सर्वात लहान मुलाला त्वचेच्या ॲलर्जीचा त्रास का होतो?

ॲलर्जी हा अनुवांशिक, पर्यावरण आणि एपीजेनेटिक घटकांमधील जटील गुंतागुंतीचा परिणाम आहे. एपीजेनेटीक घटक म्हणजे पर्यावरणातील काही घटकांचा गुणसुत्रातील जनुकांवर परिणाम होऊन त्यात बदल घडून येतो परंतु DNA मध्ये बदल होत नाही. एखाद्या व्यक्तीला ॲलर्जी होईल की नाही हे विशिष्ट जनुकीय प्रक्रिया आणि पर्यावरण आणि जनुक यामधील प्रक्रिया यावरुन ठरते. तसेच काही मुलांमध्ये अनुवंशिकतेमुळे ॲलर्जी होण्याची शक्यता असते. तसेच प्रतिजन सहन करण्याची क्षमता कमी असते आणि ही क्षमता ताणामुळे काही औषधांमुळे किंवा ताप आला तर कमी होते. जर तुमच्या मुलास ॲलर्जीच्या जनुकांचा वारसा मिळाला असेल, किंवा वारंवार पर्यावरणातील ॲलर्जी निर्माण करणारे घटक त्यांच्या संपर्कात येत असतील व त्यामुळे त्याच्या जनुकात बदल झाला असेल तर कुटुंबातील इतर कोणालाही ॲलर्जी नसली तरीही मुलाला त्रास होईल.

## प्र. ३

### माझ्या बाळाला त्वचेचा इसब आहे. माझे मुल मोठे झाल्यावर त्याला दम्याचा त्रास होईल का?

इसब हे बालपणात आढळून येणारे त्वचेच्या ॲलर्जीचे पहिले प्रकटीकरण आहे. काही प्रतिद्रव्यजनक पदार्थावर (Allergen) तीव्र संवेदना दर्शवणारी स्थिती असू शकते. ज्या मुलांना लहानपणी बालइसब असतो, त्यांना सामान्यत: आयुष्याच्या उत्तरार्धात दमा होतो. या प्रक्रियेला (Atopic March) म्हणतात. या मुलांची त्वचा कोरडी आणि भेगाळलेली असते. (आकृती क्र. १अ व ब) यामुळे त्वचेमधून धूळ, सूक्ष्म कीटक (mite) परागकण  अन्नकण वगैरे शरीरात प्रवेश करतात आणि या पदार्थांबाबत संवेदनाक्षम होण्याची शक्यता वाढवतात यामुळे ॲलर्जीसंबंधी पुढील अनेक प्रक्रिया घडून येतात. (allergic cascade) जर कुटुंबातील सदस्यांमध्ये काही प्रकारच्या ॲलर्जीचा इतिहास असेल तर मुलाल दम्याचा विकार होण्याची शक्यता वाढते. परंतु या मुलावर योग्यप्रकारे उपचार करुन त्याच्या त्वचेच्या इसबाचा योग्य इलाज केला तर त्याच्या पुढे होणाऱ्या दम्याच्या विकाराची तीव्रता कमी करता येते.







आकृती क्र. १अ व ब  बालइसब



Scanned with OKEN Scanner

प्र.४

## माझे मुल सतत खाजवत राहते, त्याची अस्वस्थता कमी करण्यासाठी मी काय करु?

त्वचेची ॲलर्जी असलेल्या मुलांमध्ये खाज सुटणे ही प्रमुख तक्रार आहे. खाजवले तर त्वचेची अधिक जळजळ होते व त्वचेचा दाह होतो. यामुळे अजून जास्त खाज सुटते. खाज-ओरखडे यांचे चक्र सुरु होते.

बाहेरुन दाह निर्माण करणाऱ्या घटकांपासून संरक्षण करण्यासाठी त्वचा भिंतीचे कार्य करते. अस्वस्थता आणि खाज कमी करण्यासाठी त्वचा अखंड ठेवणे म्हणजेच तिला कोणतीही इजा होऊ न देणे आवश्यक आहे. त्वचेची चांगली काळजी घेण्याच्या उद्देशाने खाज ओरखडे यांच्या चक्राचे नियंत्रण हे बहु आयामी पद्धतीने केले जाऊ शकते.

- त्वचा ओलसर ठेवणारे औषधे-मॉइस्चराइजर सढळपणे वापरल्याने खाज कमी होते. त्वचा नरम होण्यास किंवा त्वचेला आराम मिळण्यास वापरण्यास कोणताही पदार्थ (emollients) आणि त्वचा ओलसर ठेवणारी औषधे (moisturizer) त्वचेला ओलसर ठेवतात आणि खाज कमी करतात. आंघोळीनंतर तीन मिनिटांच्या आत ओल्या त्वचेवर ही औषधे वापरावीत.
- ज्या पदार्थांमुळे ॲलर्जी होते. (allergy triggers) त्या पदार्थांची ओळख आणि निर्मूलन : संभाव्य प्रतिद्रवजनक पदार्थ (allergen) हे रुग्णाशी बोलून सखोल माहिती घेऊन शोधता येतात. तसेच काही चाचण्या घेऊन ओळखता येतात. त्वचेवर टोचून (skin prick test) त्याद्वारे किंवा इम्मूनोग्लोबलीन E साठी रक्त चाचणी करुन ओळखले जाऊ शकतात. एकदा ओळखल्यानंतर शक्य तितके प्रतिद्रव्यजनक पदार्थ (allergen) टाळण्यासाठी उपाय योजले पाहिजेत. कृपया ऐकीव माहिती वर विश्वास ठेवू नका. तुमचे बालरोगतज्ज्ञ / ॲलर्जीतज्ज्ञ हे या बाबतीत सर्वोत्तम मार्गदर्शक आहेत.
- त्वचेवर लावावयाची दाह कमी करणारी मलमे (topical anti-inflammatory) स्टिरॉइड्स क्रीम्स/ट्रॅकोलीमस मलमे तुमच्या बालरोगतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार इसबाची जागा आणि तीव्रता यास योग्य आणि बालरुग्णाच्या वयानुसार योग्य काळाप्रमाणे वापरावीत. तुमच्या बालरोगतज्ज्ञांचा सल्ला घेतल्याशिवाय कुठलेही मलम वापरु नका.
- डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आवश्यक असल्यास खाज कमी करण्यासाठी तोंडातून औषध (antihistaminics) द्यावे.
- **सामान्य उपाय :-**
  - ★ सुती कपडे वापरावेत.
  - ★ लोकरीचे कपडे प्रत्यक्ष त्वचेला स्पर्श करतील अशा प्रकारे घालू नयेत.
  - ★ खाज टाळण्यासाठी मुलाला सर्वांग झाकले जाईल असे कपडे घालावेत.
  - ★ तुमच्या बालरोगज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार अल्कधर्मी नसलेले साबण वापरावे.





Scanned with OKEN Scanner

## प्र. ५

### माझ्या मुलाच्या पुरळासाठी म्हणून लिहून दिले होते ते मलम मी (माझ्या मनाने) लावू का? कारण त्याने लगेच पुरळ कमी होते.

त्वचेवर लावण्याचे स्टेरॉईड (topical steroid) सामान्यत: बालइसबासाठी प्रथम उपचार म्हणून वापरले जाते. ही मलमे जळजळ कमी करण्यासाठी आणि आराम देण्यासाठी खूप उपयोगी ठरतात. कोणत्या प्रकारचे स्टेरॉईड औषध वापरावे हे पुरळाची तीव्रता, पुरळ उठण्याची जागा आणि मुलाचे वय यावर अवलंबून असते. यासाठी अशा मलमाचा वापर एकाच वेळी दोन ते तीन आठवड्यांपेक्षा जास्त करु नये. अन्यथा चांगल्या परिणामापेक्षा दुष्परिणाम होऊ शकतो. दीर्घकाळापर्यंत स्टेरॉईड मलम वापरण्याचे दुष्परिणाम म्हणजे त्वचा पातळ होणे, अतिरिक्त केसांची वाढ होणे, त्वचेतून रक्तस्राव होणे आणि वाढ खुंटणे. हे मलम दिवसातून दोन पेक्षा जास्त वेळ लावू नये. म्हणूनच मलम लावण्यापूर्वी आपल्या बालरोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे योग्य ठरेल.

## प्र. ६

### काही अन्नपदार्थ माझ्या मुलाला त्वचेची ॲलर्जी होऊ शकते का?

काही खाद्य पदार्थांमुळे त्वचेची ॲलर्जी होऊ शकते. शरीरावर गांधी/दादड (urticarial) उठतात किंवा इसब (atopic eczema) होतो.

काही मुलांना दूध, अंडी. मासे, काजू, सोयाबीन, गहू, डाळी यासारख्या अन्नाची ॲलजी असू शकते. योग्य माहिती विचारुन काय खाल्ले की गांधी उठतात ते लिहून ठेवले तर ॲलर्जी निर्माण करणारे खाद्यपदार्थ ओळखले जाऊ शकतात. तसेच त्वचेवर काही चाचण्या करुन (atopic patch test) देखील विशिष्ट पदार्थांची ॲलर्जी असल्यास कळून येण्यास मदत होते. तसेच तुमच्या मुलाच्या आहारात ते पदार्थ टाळता येऊ शकतात. अन्यथा त्वचेची ॲलर्जी असलेल्या मुलांना सामान्यत: आहाराचे कोणतेही बंधन नसते आणि ॲलर्जी विरोधी आहार नसतो.

तसेच काही अन्नपदार्थांबाबत व्यायाम प्रेरित ॲलर्जी (exerciseinducad food allergy) नावाचा आणखी एक प्रकार आहे. यामध्ये काही मुलांना विशिष्ट अन्न खाल्ल्यानंतर व्यायाम केला तर अंगावर गांधी उठणे (urticarial) किंवा (anaphylaxis) म्हणजे अंगावर सूज येणे आणि शुद्ध हरपणे असा प्रकार (ॲलर्जीचा गंभीर प्रकार) विकसित होतो. या प्रकारात जेवणानंतर दोन-चार तासांनी लक्षणे दिसू लागतात. व्यायामाच्या काही तास आधी आक्षेपार्ह (allergic) अन्नपदार्थ टाळल्याने आणि जेवणानंतर चार तासांनी व्यायाम केल्याने हे टाळता येते.



Scanned with OKEN Scanner

## प्र. ७

**मला दोन मुले आहेत. एकाला अंगावर पुरळ उठते (hives) आणि दुसऱ्याला बालइसब (atopic eczema) आहे. त्यांच्या ॲलर्जीसाठी चाचण्या करुन घेण्याची गरज आहे का?**

बालइसबाचे निदान प्रामुख्याने वैद्यकीयदृष्ट्या केले जाते, कधीकधी रोग वाढवणारे घटक शोधण्यासाठी काही चाचण्या केल्या जातात.

काही खाद्यपदार्थ आणि औषधे तीव्र स्वरुपाच्या ॲलर्जीसाठी (urticaria) कारणीभूत असू शकतात. परंतु वारंवार उठणाऱ्या गांधी (chronic urticaria) निर्माण करणाऱ्या पदार्थांची भूमिका संशयास्पद असते.

त्यामुळे ॲलर्जीसाठी केल्या जाणाऱ्या चाचण्या या रोगाचे निदान करण्यासाठी केल्या जात नाहीत. परंतु काही वेळा कशामुळे ही व्याधी उद्भवते आहे हे ओळखण्यासाठी केल्या जातात. त्या गोष्टी टाळल्यास तुमच्या मुलांमध्ये इसब वाढणे किंवा वारंवार गांधी उठणे (urticaria) या प्रक्रियेस प्रतिबंध होतो.

तुमच्या मुलाला या चाचण्या गरजेच्या आहेत की नाही हे तुमचे बालरोगतज्ज्ञ ठरवतील.

## प्र. ८

**माझ्या मुलाला कधी कधी खूप खाज सुटून त्वचेवर लाल पुरळ येते. काही वेळाने बरे होते किंवा नाहीसे होते. ते कुठल्या प्रकारचे पुरळ असेल?**

या लाल आणि खाजणाऱ्या गांधी किंवा मोठ्या आकाराचे पुरळ म्हणजेच अर्टिकेरिया. सामान्यत: ही तीव्र ॲलर्जीमधील त्वचेची स्थिती आहे. काही व्यक्तींना हे पुरळ काही अन्नपदार्थ, औषधे, संसर्ग यामुळे किंवा कीटकांच्या विषाचा संपर्क झाल्यावर किंवा काहीही कारण नसतांना मास्ट नामक पेशींच्या D उत्तेजनामुळे हिस्टामिन आणि इतर रसायने रक्तात मिसळल्यामुळे विकसित होते.

अंगावर उठणाऱ्या पित्ताच्या गाठी/गांधी तीव्र किंवा साध्या असू शकतात. मुलांमध्ये बहुतेकदा हे पुरळ तीव्र असते. ते स्वयंमर्यादित असते, थोडा काळ टिकते. सामान्यत: हे बरे होते. बहुतेक तीव्र स्वरुपाचे पुरळ (acute urticarial rash) हे विषाणूंच्या संसर्गामुळे येते. तीव्र स्वरुपाचे पुरळ उठलेल्या बालरुग्णामधील सुमारे २० ते ३०% केसमध्ये दीर्घकालीन किंवा वारंवार उद्भवणाऱ्या गांधींचा (chronic or recurrent urticaria) आजार आढळून येतो. (आकृती २ अ आणि ब) अंगावर उठणाऱ्या पित्ताच्या गाठी तीव्र/तत्कालीन आणि दीर्घकालीन या दोन्ही स्थितीमध्ये शरीरामधील विविध भागांवर सूज येते (angioedema) ही सूज डोळे, हात, पाय किंवा ओठ या अवयवांच्या त्वचेच्या खोल थरांमध्ये येते आणि गंभीर अवस्था होऊ शकते.

अंगावर उठणाऱ्या पित्ताच्या गाठी येण्याची कारणे.

अंगावर उठणाऱ्या पित्ताच्या गाठी कालावधीनुसार तीव्र/तत्कालीन किंवा दीर्घकालीन अशा दोन गटात विभागल्या जातात. (आकृतीबंद आराखडा २)

रोगासंबंधी घेतलेली माहिती, रुग्णतपासणी आणि आवश्यक असल्यास प्रयोगशाळेच्या चाचण्या यांच्या आधारे बालरोगतज्ज्ञ निदान करतात.



Scanned with OKEN Scanner



**आकृती क्र.२अ आणि ब त्वचेवर उसळलेले पित्त (दादड किंवा गांधी)**
(urticarial rash)

**आकृतीबंद आराखडा २** (Flowchart)

**वर्गीकरण**

**तीव्र ६ आठवड्यांपेक्षा कमी टिकणारे पित्त**

- **अन्नपदार्थ** उदा. : अंडी, दूध, गहू, मासे, सोया
- **जंतुसंसर्ग शक्यतो विषाणू**
- **औषधे**
- **कीटकांनी घेतलेले चावे**
- **संपर्क** आल्यामुळे उठणारे पित्त (लेटेक्स, परागकण आणि प्राण्यांची लाळ)

**दीर्घकालीन पित्त ६ आठवड्या पेक्षा जास्त**

- **शारीरिक**
  - पित्त
  - डर्मोग्राफीजन
  - थंडीमुळे
  - दाब
  - पाणी
  - व्यायाम
  - घाम
  - कंपने
- **स्वयं प्रतिकार रोग**
- **अंतरग्रंथी संबंधित**
- **कर्करोग**

**❐ उपचार -**

**❖ तीव्र ६ आठवडे पेक्षा कमी काळ गांधी उठल्या असल्यास**

१. बहुतेक पुरळ विषाणू संसर्गामुळे उठतात. ते कालमर्यादित असतात. आपणाहून कमी होतात.

२. ज्या पदार्थांमुळे पुरळ येते त्या गोष्टी टाळाव्या. उदा. अन्नपदार्थ, औषधे वगैरे

३. कॅलामाईन लेशन सारखे आराम देणारे मलम वापरणे.

४. झोप न येणारी ॲलर्जीवरील औषधे (cetirizine loratadine fexofenadine etc.) खाजेसाठी वापरतात

५. ॲलर्जीचा गंभीर आजार (Angioneurotic edema) झाल्यास घसा आणि वायुमार्ग यांना त्रास होतो. श्वास घेण्यास अडथळा निर्माण होतो व अंगावर पित्ताच्या गाठी उठतात तेव्हा मुलाला तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागू शकते आणि एपिनेफ्रिनची आवश्यकता लागते. अतिदक्षता विभागात दाखल करुन निरीक्षण करणे गरजेचे असते.

**सहा आठवड्यापेक्षा जास्त : दीर्घकाळ टिकणारे पित्त उसळले असता (chronic urticaria)**

★ कारक घटक ओळखणे आणि त्याला काढून टाकणे हा उपचारांचा मुख्य हेतू असतो.

★ झोप न येणारी ॲलर्जीवरील औषधे (Antihistamine) ही उपचारांची पहिली पायरी आहे.

★ काही वेळा लक्षणे नियंत्रणात येईपर्यंत औषधाची मात्रा चौपट करावी लागते. (तुमच्या बालरोगतज्ज्ञांच्या किंवा ॲलर्जीवरील तज्ज्ञांच्या सूचनांचे पालन करा.)

★ उच्च डोसाला प्रतिसाद न मिळाल्यास तुमचे बालरोगतज्ज्ञ पर्यायी औषधांचा विचार करतील आणि अंगावर उठणाऱ्या पित्ताच्या गाठी निर्माण करणाऱ्या इतर रोगांच्या दृष्टीने अधिक तपासणी करतील. बहुतेक रुग्णांना स्थिर होण्यास वेळ लागू शकतो. त्यांना रोगांच्या स्थिर होण्यास वेळ लागू शकतो. त्यांना रोगप्रतिकारक शक्तीत बदल करणाऱ्या औषधांची (immunomodulators) आवश्यकता भासू शकते.



31 08 2021 11 37 52
Scanned with OKEN Scanner

## प्र. ९

## माझी मुलगी जेव्हा कृत्रिम कानातले किंवा बांगड्या घालते तेव्हा तिच्या त्वचेवर लाल पुरळ उठते, खाज सुटते आणि त्वचेतून पाण्यासारखा स्राव होतो. तिला धातूंची ॲलर्जी आहे का?

कृत्रिम दागिन्यांमध्ये आढळणारे निकेल हे ॲलर्जीचे कारण असू शकते.

जेव्हा एखाद्या व्यक्तीला क्षोभकारक (irritant) पदार्थाशी संपर्क आल्यास किंवा त्याला त्या पदार्थाची ॲलर्जी आहे अशा पदार्थाशी संपर्क आल्यास लाल गांधी उठतात आणि तिकडच्या त्वचेचे पापुद्रे निघतात, त्या स्थितीला संपर्क त्वचारोग असे म्हणतात. (आकृती ३ अ आणि ब व आकृती बंद आराखडा [Flowchart])




**आकृती क्र. ३ अ आणि ब चांदी आणि चामड्यामुळे झालेला त्वचारोग)**

(आकृती बंद आराखडा)

**संपर्क त्वचा रोगाचे वर्गीकरण**

**ॲलर्जीमुळे झालेला संपर्क त्वचारोग (ACD)**

१. रोगप्रतिकारक दृष्ट्या अतिसंवेदनाशील प्रतिक्रिया
२. पूर्व संवेदना आवश्यक आहे.
३. हा ॲलर्जी असलेल्या मुलांमध्ये दिसून येतो.
४. खूप खाज येते.
५. धातू सौंदर्य प्रसादने, रबर,चिकट पदार्थ, रेझीन

**क्षोभक गोष्टींमुळे झालेला संपर्क त्वचारोग (ICD)**

१. रोगप्रतिकारक घटक नसलेले व त्वचेचे नुकसान करणारे
२. पूर्व संवेदनाची गरज नसते.
३. ॲलर्जीचा संबंध नसतो.
४. त्वचेची आग खूप होते.
५. साबण पावडर, आम्लपदार्थ, शरीरातील द्रव, लाळ, लाळ प्रेरीत ओष्ठरोग

**इतर प्रकार**

१. ॲलर्जीमुळे झालेला संपर्क त्वचारोग आणि क्षोभक गोष्टींमुळे झालेला संपर्क त्वचारोग या दोन्हींमुळे एकत्रपणे होणारा त्रास (combination of ICD and ACD)
२. फोटो संपर्क त्वचारोग (PCD) - ॲलर्जी निर्माण करणारा पदार्थ किंवा केमिकल वापरल्यानंतर सूर्यप्रकाशात गेल्यावर पुरळ विकसित होते.
३. शरीरातील विविध मार्गाने उद्भवणारा त्वचारोग (SCD): जेव्हा ॲलर्जी निर्माण करतात आणि नंतर ते घटक तोंडावाटे, श्वासावाटे किंवा रक्तावाटे शरीरात शिरतात आणि त्वचेवर पुरळ/ गांधी येतात.

तुमचे ॲलर्जीतज्ज्ञ (Patch) चाचण्या वापरुन अलर्जीक संपर्क त्वचारोगाचे निदान करतील. ॲलर्जी निर्माण करणारा विशिष्ट घटक ओळखण्यास देखील या चाचण्या मदत करतात.



Scanned with OKEN Scanner

**उपचार**

- **आक्षेपार्ह घटक टाळणे :** पालकांना आक्षेपार्ह घटक ओळखण्याचे आणि टाळण्याचे प्रशिक्षण दिले जाते.
- **सहाय्यक उपाय :**
  १. पुरळ उठलेल्या भागावर थंड सलाईन किंवा पाण्याने शेकावे.
  २. कॅलामाइन लोशनचा वापर देखील उपयुक्त ठरतो.
- **औषधोपचार :**
  १. झोप न येणारी ॲलर्जीवरील औषधे (nonsedative antihistaminic) आणि स्टिरॉइड्स क्रीम लिहून दिली जातात.
  २. पुरळावर लावण्यासाठी (calcineurin inhibitors) किंवा (immunosuppressive drugs) चा वापर दीर्घकालीन समस्या किंवा प्रतिसाद न देणाऱ्या समस्या किंवा दीर्घकाळ उपचार आवश्यक असलेल्या प्रकारांमध्ये केला जातो.
  ३. ॲलर्जी निर्माण करणारे पदार्थ ओळखल्यास आणि पूर्णपणे टाळल्यास आजार बरा होण्यास मदत होते.

**प्र. १०**

## मुलाची त्वचेची ॲलर्जी पूर्णपणे बरी होऊ शकते का?

त्वचेच्या ॲलर्जीपैकी बहुतेक दीर्घकालीन असतात. त्या परत परत उद्भवत राहतात. योग्य उपचार, ॲलर्जी निर्माण करणारे पदार्थ ओळखणे आणि टाळणे तसेच या घटकांचे समूळ उच्चाटन करणे गरजेचे आहे. त्वचेची ॲलर्जी खूप चांगल्या प्रकारे नियंत्रित केली जाऊ शकते जेणेकरुन तुमच्या मुलाला चांगले जगता येईल. काही प्रकरणांमध्ये योग्य उपचारांचा उपाय करुनही आराम मिळत नाही. नगण्य दुष्परिणाम, लक्षणे कमी करणे आणि मुलाला चांगल्या दर्जाचे जीवन जगता येणे हे उद्दिष्ट असले पाहिजे.

**बालइसब** (Atopic dermatitis) असलेल्या मुलांच्या पालकांसाठी काही माहिती

त्वचेची ॲलर्जी असलेल्या मुलांना खालील गोष्टी केल्याने चांगले जीवन मिळू शकेल.

**त्वचेची काळजी :-**

१. अल्कली मुक्त साबण
२. आंघोळीसाठी कोमट पाणी वापरा. पोहायला प्रोत्साहन द्या. बुडबुड्यांची आंघोळ (bubble bath) टाळा.
३. आंघोळीनंतर त्वचा उत्तम कोरडी करावी. खसखसून पुसू नये.
४. सुती कपडे वापरावेत. लोकरीचे कपडे टाळावेत किंवा त्वचेला लोकरीचा थेट संपर्क टाळावा.
५. त्वचेवर ओरखडे येऊ नयेत म्हणून खाजवणे टाळण्यासाठी मुलाला पूर्ण बाहीचे कपडे घाला.

**आहार :-**

१. आयुष्याच्या पहिल्या ६ महिन्यांमध्ये निव्वळ स्तनपान आवश्यक आहे.

२. ६ महिन्यांपूर्वी पूरक पदार्थ / घनपदार्थ टाळा.

३. एखादा पदार्थ आक्षेपार्ह आहे हे ओळखल्याशिवाय तो अन्नपदार्थ टाळणे योग्य नव्हे. त्यामुळे मुलामध्ये पोषणमूल्यांची कमतरता येऊ शकते.

**सभोवतालच्या पर्यावरणाची काळजी :-**

१. अंथरुण आणि पांघरुण स्वच्छ ठेवा, त्यांना दररोज कडक सूर्यप्रकाशात वाळवा.

२. भरलेली / मऊ खेळणी वापरणे टाळा.

३. घरामध्ये जाजम टाळा.

४. अत्यंत थंड / उष्ण हवामान टाळा.

५. तुमच्या बालरोगतज्ज्ञांनी ओळखलेले ॲलर्जी निर्माण करणारे पदार्थ टाळा.

**वैद्यकीय काळजी :-**

१. आपल्या बालरोगतज्ज्ञांच्या सल्ल्याचे पूर्णपणे पालन करा.

२. जरी ॲलर्जी चांगल्या प्रकारे नियंत्रित असेल तरी तुमच्या बालरोगतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार नियमित फेरतपासणीला जा.

३. स्वत:हून औषधोपचार करु नका.

४. तुमच्या मनाने स्टिरॉइड क्रीम वापरु नका. फक्त तुमच्या बालरोगतज्ज्ञांच्या सल्ल्यानेच वापरा.

५. "ड" जीवनसत्वाची कमतरता असल्यास ते घ्या.

६. काही खाद्यपदार्थ किंवा औषधाची ॲलर्जी असल्यास ते लिहून मनगटावर बांधा, तुमच्या मुलाच्या ॲलर्जी बद्दलचे कार्ड त्याच्या गळ्यात किंवा पिशवीत घाला.

७. तुमच्या मुलाच्या ॲलर्जीबद्दल शाळेत कळवा.





Scanned with OKEN Scanner